# एक विश्वचेतना : दादी जानकी

'विश्वातील स्थिर मनाची महिला' हा किताब संयुक्त राष्ट्रांकडून प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या सध्याच्या विदेश व्यवहार प्रमुख दादी जानकी यांना मिळाला. अमेरिकेतील युनिवर्सिटी ऑफ टेक्सास येथे त्यांच्या मनाच्या स्थिरतेची सर्व उपलब्ध शास्त्रीय परीमाणानी शास्त्रज्ञांनी चाचणी घेतली. त्यांना उलट सुलट आणि भंडावून सोडणारे कितीही प्रश्न विचारले तरी त्यांनी स्थिर मनाने त्यांची अचूक उत्तरे दिली. या घटनेमुळे त्या भारतातही अध्यात्मिक क्षेत्रातील पहिल्या आणि सर्वश्रेष्ठ महिला ठरल्या.

त्यांची अशीच आणखी एक चाचणी लंडनमध्ये रॉयल आल्बर्ट हॉलमध्ये झाली आणि त्या घटनेने त्यांना अध्यात्मिक क्षेत्रात एक असीम उंची दिली. युरोप मध्ये युरी ग्यालर नावाचा एक मनोवैज्ञानिक अतिशय प्रसिद्ध होता. दृष्टीच्या शक्तीने धावती ट्रेन रोखण्याची, हातात सुके धान्य घेवून त्याला अंकुर काढण्याची, एखाद्याच्या कारच्या चाव्या संकल्प शक्तीने वाकविण्याची क्षमता त्याने  सिद्ध केली होती. दादी जानकी विदेश सेवेसाठी इंग्लंडमध्ये गेल्यानंतर त्यांचीही कीर्ती हळूहळू पसरली. त्यातून दादी जानकी आणि युरी ग्यालर यांच्या शक्तींचा सामना ठेवायचा निर्णय तेथील काही लोकांनी घेतला. दादी जानकीही लागलीच त्यासाठी तयार झाल्या. युरी ग्यालर रॉयल आल्बर्ट हॉलमध्ये आपले प्रयोग दाखविले. नंतर दादी जानकी यांच्याशी तो सामन्यासाठी सिद्ध झाला. परंतु दादी जानकी यांच्या आत्मिक तरंगातून त्याने सुख, शांती, आनंद यांचा एकाचवेळी अपरिमीत अनुभव घेतला आणि आपण सामना करण्यासाठी आलो आहोत हेच तो विसरुन गेला. आपल्याला आज जे मिळाले ते आजवर कोणाकडूनही मिळाले नसल्याचे त्याने दादी जानकी यांना सांगितले आणि त्यांना तो शरण गेला. केवळ युरी ग्यालरच नव्हे तर त्या हॉलमध्ये उपस्थित असलेल्या पाच हजार लोकांनीही या शक्तींचा अनुभव घेतला. हॉलमधील वातावरण एका दिव्यतेने यावेळी भारुन गेले होते. टाचणी पडली तरी आवाज यावा अशी निरामय शांतता यावेळी रॉयल आल्बर्ट हॉलमध्ये होती. कार्यक्रम संपल्यानंतर सगळे एका सुखाच्या, शांतीच्या, आनंदाच्या सागरात डुंबत बाहेर पडले होते. या दोन कार्यक्रमानंतर विदेशातील हजारो लोकांची त्यांच्या मागे रिघ लागली. आज त्या एंजेलिस,फरिश्ता वा देवदूताच्या स्थिती मध्ये कार्य करतात. अध्यात्मातील ही सर्वश्रेष्ठ स्थिती आहे.

वयाच्या एकविसाव्या वर्षी त्यांनी पाकिस्थानच्या सिंध प्रांतात संस्थेचे कार्य सुरु असताना हे ज्ञान घेतले आणि या कार्यात स्वत:ला झोकून दिले. ईश्वरीय विश्वविद्यालयाचे संस्थापक प्रजापिता ब्रह्मा हयात असताना त्यांनी १४ वर्षे अखंड तपश्चर्या केली. त्यानंतर त्यांनी अनेक मानवात्म्यांना देवतुल्य बनविण्याचे शिक्षण दिले आहे, देत आहेत. सत्यता, आदर, अखंड प्रेम, सद्भावना, शुभचिन्तन, त्याग या त्यांच्या विशेषता आहेत. त्यांना परमेश्वराची साक्षात चैतन्य मूर्ती मानले जाते. मा संतोषी, जगतजननी, सरस्वती, करुणामयी अशा अनेक उपाधी त्यांना लावल्या जातात. बोलत असताना सरस्वतीच्या वीणेतून अखंड मंजूळ, मंद सुरांचा आवाज कानावर पडत राहावा, हा आवाज असाच कायम राहावा आणि आपण त्यात हरवून जावे तसे त्यांचे बोल वाटतात. नव्हे त्या अमृतधाराच बरसवत असतात. त्या बोलत असताना सगळे त्यात स्नान करीत असल्याचा अनुभव होतो. लंडनमध्ये १९८४ साली आगमन झाल्यानंतर त्यांच्या संपर्कात आलेल्यांना काही ना काही अनुभूती आल्याने ईश्वरीय विश्वविद्यालयाची केंद्रे देश विदेशात भराभर उघडली गेली. वय नव्वद असले तरी पंचविशीच्या तरुणाला लाजवील अशी उमेद त्यांच्यामध्ये आहे. सेवेसाठी त्या चोवीस तास सज्ज असतात म्हणून इंग्रजीतला 'एवररेडी' हा शब्द त्यांना तंतोतंत लागू पडतो. 'वर्डस वंडर वूमन' या नावानेही त्या विदेशात परिचित आहेत.

जगात अनेक योग आहेत परंतु मुळातून माणसाचे परिवर्तन करणारा केवळ राजयोग आहे हे त्यांचे सांगणे. कारण विचारातून विकार सुरु होतात आणि विकारांचे मुलच सकारात्मक चिंतनाने राजयोगात खुडून काढले जाते. त्यामुळे मनाबरोबर शरीर तंदुरुस्त राहते, ते कांचनकाया बनते आणि त्यातून सुगंध पसरतो हे त्यांनी आपल्या आचरणातून सिध्द केले आहे. राजयोगाचा उपयोग एखाद्या औशधी प्रमाणे त्या आपल्या मनावर आणि शरीरावर करतात आणि स्वत:च स्वत:च्या डॉक्टर बनतात. त्यांचे शुक्रवार ३१ मार्च रोजी गोव्यात आगमन होत आहे. कला

अकादमी, पणजी येथे त्यांचा १ रोजी सायंकाळी ५ ते ७.३० या काळात तसेच पांडव कपेल जवळील कोस्टा ग्राऊण्ड, आके बायश, मडगाव येथे २ रोजी सायंकाळी ४ ते ७ या काळात जाहीर कार्यक्रम आहे. त्यांचा सगळ्यांना लाभ घेता येईल.

- अनंत संभाजी.